

सन्माननीय सभासद, माताभगिनी व सहकारी बंधूंनो,

आपल्या बँकेचा सन २०१७-१८ सालचा म्हणजेच ३१/३/२०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ५७ वा वार्षिक अहवाल तसेच ताळेबंद, नफातोटा पत्रक आपणासमोर मांडतांना मला कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत आहे. दिनांक ३१/३/२०१८ रोजी संपलेल्या ५७ व्या वर्षाचा अहवाल ताळेबंद व नफातोटा पत्रक आपल्या समोर सादर करण्यापूर्वी गतवर्षीच्या कामकाजाचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

गेल्या चार वर्षापासून देशात सर्वच क्षेत्रात बदलाचे वारे वाहत आहेत. विशेषतः आर्थिक क्षेत्रात केंद्रातील मोदी सरकार अनेक क्रांतीकारी पावले उचलत आहे. याचाच एक महत्वाचा टप्पा म्हणून जी.एस.टी. चा उल्लेख करावा लागेल. पारंपारिक व क्लिष्ट कर संकलन पध्दतीत अमुलाग्र सुधारणा करण्याच्या दृष्टीने मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी १ जुलै २०१७ रोजी वस्तू व सेवा कर (GST) लागु केला. सरकारचा हा क्रांतीकारी निर्णय देशाच्या आर्थिक सुधारणांमधील मैलाचा दगड म्हणून आगामी काळात ओळखला जाईल अशी मला खात्री आहे. दि चिखली अर्बन को-ऑप. बँकेचा अध्यक्ष म्हणून या विधायक निर्णयाचे मी स्वागत करतो व बँकेच्या माध्यमातून या निर्णयाची चोख अंमलबजावणी केली जाईल अशी ग्वाही देतो. बँकेच्या कार्यक्षेत्रातील बहुतांश भाग कृषीवर अवलंबून आहे. अहवाल वर्षात येथील शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात आस्मानी संकटांना सामोरे जावे लागले. त्याचा काही अंशी कर्जवसुलीवर सुध्दा परिणाम झाला. मात्र या विपरीत परिस्थितीत देखील आपल्या बँकेने ठेवी व कर्जवसुली सोबतच शाखा विस्तार करून अभिनंदनीय कामगिरी बजावली आहे. आपणा सर्वांच्या लाख मोलाच्या सहकार्य व प्रोत्साहनामुळेच हे शक्य होवू शकले, त्याबददल मी आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

समाजातील गरजू, होतकरू व आर्थिक दुर्बल घटकांच्या आयुष्यात सुखाचे दिवस यावेत हे ध्येय बाळगून आपली बँक कार्य करत आहे. बँकेच्या सभासदांच्या व ग्राहकांच्या गरजा व सूचना विचारात घेवून बँक आपले कामकाज करीत असते. बँकेच्या सेवांचा लाभ जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहचावा या उद्देशाने बँकेने आपल्या सर्व शाखा व ग्राहक सेवा केंद्रे अद्ययावत व सक्षम बनवली आहेत. याचा परिणाम म्हणून आपली बँकींग सेवा महानगरापासून वाडया वस्त्यांपर्यत पोहचली आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात आपल्या बँकेने नांदगाव (जिल्हा नाशिक), सातारा परिसर (औरंगाबाद), लासूर स्टेशन, शिवना (ता.सिल्लोड), गारखेडा (औरंगाबाद) आणि जामनेर (जिल्हा-जळगांव खान्देश) येथे शाखा सुरू केल्या आहेत. नांदगाव आणि जामनेर शाखेच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या आपल्या बँकेने उत्तर महाराष्ट्र व खान्देश विभागात दमदार पदार्पण केले आहे. एकुण ४ ग्राहक सेवा केंद्र सुरू असुन यावर्षी बिबी (ता. लोणार) येथे ५ वे ग्राहक सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे. आगामी काळात ६ ते ७ ग्राहक सुविधा केंद्र सुरू करण्यात येणार आहेत.